आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक- 30.12.2025 **वार- मंगळवार**

पुणे-निवडणूक

राज्यात महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. पुणे महापालिका निवडणुकीसाठी गेल्या सहा दिवसांत केवळ 48 अर्ज दाखल झाले होते. आज शेवटचा दिवस असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल झाल्यानं निवडणूक यंत्रणेवर ताण निर्माण झाल्याचं चित्र आहे.

महापालिका प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, आज दिवसभरात 1 हजार 4 शे 49 अर्जांची विक्री झाली असून, आतापर्यंत एकंदर अर्ज विक्रीचा आकडा 11 हजारांच्या पुढे गेला आहे.

उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत पुण्यात शिवसेना आणि भारतीय जनता पक्षातील युती संदर्भात संभ्रम कायम होता. महानगरपालिका निवडणूक स्वतंत्रपणे लढवण्याचा शिवसेनेचा निर्णय असल्याचं पुण्यातील स्थानिक शिवसेना नेत्यांनी सांगितलं असलं तरी शिवसेना नेते आणि मंत्री उदय सामंत यांनी मात्र अर्ज मागे घेण्याच्या मुदतीपर्यंत जागा वाटपाबाबत समेट घडवून आणला जाईल असं म्हटलं आहे.

निवडणूक

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगानं उमेदवारांच्या निवडणूक प्रचारासाठी प्रसारित होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक जाहिराती, समाज मध्यमांवरील प्रचार, तसंच इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधील जाहिरातींसाठी पूर्वप्रमाणन करणे बंधनकारक आहे. यासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या सर्व उमेदवारांनी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील प्रसार माध्यम प्रमाणन आणि संनियंत्रण समिती कार्यालयाकडे अर्ज सादर करणे बंधनकारक आहे, अशी माहिती समितीचे सदस्य सचिव किरण गायकवाड यांनी दिली आहे.
पूर्वप्रमाणन मंजूर झाल्यानंतर अधिकृत प्रमाणपत्र देण्यात येईल अशी माहिती समितीच्या वतीनं देण्यात आली आहे.

मतदान शपथ

पिंपरी चिंचवडचे महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत चिंचवड येथील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात, एका नाट्यप्रयोगाच्या वेळी, नाट्य रसिकांनी, मतदान करण्याची शपथ घेतली. मनोरंजनासोबतच सामाजिक जाणीव जागृत करणारा हा उपक्रम विशेष कौतुकास्पद असल्याची भावना प्रेक्षकांनी व्यक्त केली.

नववर्ष-बंदोबस्त

नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात 31 डिसेंबर रोजी अनुचित घटना घडू नये, यासाठी स्वतंत्र बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. शहरात ड्रोनच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार असून विविध प्रमुख चौकांसहित शहरात 60 ठिकाणी नाकाबंदी करून मद्यपी वाहनचालकांची तपासणी सुरू आहे. वाहतूक शाखेकडून मागील वर्षभरात सुमारे साडेसहा हजार मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे अशी माहिती पोलीस आयुक्त कार्यलयाकडून देण्यात आली आहे

नववर्ष- मोहीम

नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेनंही विशेष मोहीम हाती घेतली आहे. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे. ही मोहीम पुढील आठवड्यापर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेने दिली आहे.

सायकल स्पर्धा

'बजाज पुणे ग्रँड टूर 2026' सायकल स्पर्धेच्या माध्यमातून पर्यटन आणि क्रीडा क्षेत्रात जागतिक हब म्हणून ओळख निर्माण करण्याकरिता प्रशासन प्रयत्नशील असून त्यादृष्टीनं तयारी करीत आहे; जिल्ह्यातील विद्यापीठे, महाविद्यालये, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, नेहरु युवा केंद्र, क्रीडा संघ, ग्रामंपचायतीने सक्रीय सहभाग घेत स्पर्धा यशस्वी करण्याकरिता एकत्रितपणे प्रयत्न करुया, असं आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केलं आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते आज बोलत होते.

पुणे शहराला असलेला सायकलीचा इतिहास, इथली भौगोलिक परिस्थिती, जैवविविधता, ऑलिम्पिक स्पर्धेकरिता सायकलपट्टूंना प्रोत्साहित करणे या सर्व बाबींचा संगम साधून या स्पर्धेचं आयोजन 19 ते 23 जानेवारी या कालावधीत करण्यात आलं आहे. युसीआय सायकलिंग कॅलेंडरमध्ये या स्पर्धेचा समावेश करण्यात आला असून या स्पर्धेचं थेट प्रक्षेपण जगभरात होणार आहे.

विजयस्तंभ

कोरेगाव भीमा इथं एक जानेवारी रोजी शौर्यदिनानिमित्त विजयस्तंभ अभिवादनासाठी मोठ्या प्रमाणावर अनुयायी येतात. या पार्श्वभूमीवर कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पुणे शहर पोलिसांकडून सर्वंकष तयारी करण्यात आली आहे. कोरेगाव भीमा परिसरात सुमारे साडेसात हजार पोलिस अधिकारी, कर्मचारी तैनात असतील, अशी माहिती पोलीस आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आली आहे. 22 ठिकाणी वाहनतळ निश्चित करण्यात आले आहेत. पोलिस टॉवर, ड्रोनद्वारे परिस्थितीवर देखरेख ठेवण्यात येणार असून चोरीचे प्रकार रोखण्यासाठी विशेष पोलिस पथकं नेमण्यात आली आहेत.

हवामान

पुणे आणि परिसरात आज 9 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. उद्याही किमान तापमान साधारण असंच राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.